नि.दि.दा.क्र.१२५/२०१२
नि.क्र.१५८

प्रतिवादी क्र.२ करीता सा.क्र.१

**<u>वादींकरिता उलट तपास विधीज्ञ श्री.जी.आर.साळूंके यांच्या वतीने पुन्हा शपथेवर सुरू</u>**

१८. दत्तक पत्राची नोंद दर्शविणारा खासरा पाहणीशिवाय ईतर कागद माझ्याकडे नाही. पद्मीणबाई यांचे पती रामा दिवे हे नाहीत याबाबत मी आक्षेप घेतलेला नाही, साक्षीदार स्वत: सांगतात संबंध नसल्यामुळे तसा प्रश्न उद्भवला नाही. सन-२०१२ पासून आजतागायत मी पद्मीणबाई यांचे पती रामा दिवे नाहीत म्हणून आक्षेप घेतलेला नाही.

प्रश्न- पद्मीणबाई यांचा विवाह रामा दिवे यांच्यासोबत झाला नाही हे दर्शविणारा पुरावा आपण जोडला आहे काय ?

उत्तर- पद्मीणबाई त्यांची पत्नी नाही अशी माहिती मला माझ्या वडिलांनी दिलेली होती.

१९. पद्मीणबाई हया रामा दिवे यांच्या पत्नी नाहीत म्हणून मी व माझे वडिल यामध्ये संघर्ष झालेला नाही. पद्मीणबाई या रामा दिवे यांच्या पत्नी नाहीत असे माझ्या वडिलांनी मला केव्हाही सांगितले नाही हे म्हणणे खरे नाही. पद्मीणबाई हया रामा दिवे यांच्या पत्नी नाहीत हे मला सांगण्याचे काही एक कारण घडले नव्हते, साक्षीदार स्वत: सांगतात पण माझ्या वडिलांनी मला तशी माहिती दिलेली आहे.

प्रश्न- तुमच्या वडिलांनी पद्मीणबाई या रामा दिवे यांच्या पत्नी नाहीत असे कोणत्या वर्षी सांगितले होते ?

उत्तर- २० ते २५ वर्षापूर्वी सांगितले आहे.

२०. वडिलांनी पद्मीणबाई या रामा दिवे यांच्या पत्नी नाहीत असे कोणत्या वर्षी सांगितले होते ते मी सांगू शकत नाही. माझ्या वडिलांनी मला तसे ज्या वर्षी सांगितले त्यावेळी माझे वय सुमारे २४ ते २५ वर्षे होते.

२१. उत्तमराव माधवराव दिवे हे कोण आहेत ते मला माहित नाही. शिवाजी माधवराव दिवे हे कोण आहेत हे मला आठवत नाही. रूपाबाई माधवराव दिवे या माझ्या आई आहेत. माधवराव रामराव दिवे हे माझे वडिल आहेत. बलभिम माधवराव

दिवे हे कोण आहेत हे मला आठवत नाही. सुमित्रा व्यकंटराव माने या कोण आहेत हे मला आठवत नाही. उत्तम विरूध्द माधव वगैरे नि.दि.दावा क्र.१५१/२०१० हा माझ्या विरूध्द दाखल होता हे म्हणणे खरे नाही. नि.दि.दावा क्र.१५१/२०१० हा दाखल नव्हता हे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. नि.दि.दावा क्र.१५१/ २०१० मध्ये पद्मीणबाई यांनी मला त्या दाव्यात पक्षकार करावे म्हणून अर्ज दिल्याचे मला माहित नाही. आक्षेपामुळे तो दावा काढून घेतल्याचे मला माहित नाही. त्या दाव्यात वादी पद्मीणबाई यांना काय अधिकार होते हे मला आठवत नाही. नि.दि.दावा क्र.१५१/२०१० बाबत मी माझा सरतपास दाखल करीत असताना माझ्या वकिलांना माहिती दिली होती किंवा कसे हे मला आठवत नाही.

प्रश्न- तुम्हाला तुमच्या सरतपास शपथपत्रातील केवळ नि.दि.दावा क्र.१५१/२०१० बाबतचा मजकूर आठवत नाही का सर्वच मजकूर आठवत नाही ?

उत्तर- जे आठवते ते मी सांगतो.

२२. नि.दि.दावा क्र.१५१/२०१० मध्ये गट क्र.१४७ जी मिळकत होती ती रामाची मिळकत होती असे कथन होते हे मला माहित नाही. ग्रामपंचायत कार्यालय, पानचिंचोली यांनी पद्मीणबाई या रामा दिवे यांच्या पत्नी असल्याचे व ते पानचिंचोली येथील रहिवासी असल्याचे दिलेले प्रमाणपत्र खोटे आहे. वादी पद्मीणबाई व त्यांची मुलगी जनाबाई यांना ग्रामपंचायतने दिलेले वारसा प्रमाणपत्र हे खोटे आहे. वादी पद्मीणबाई व त्यांची मुलगी जनाबाई यांना न्यायालयातून वारसा प्रमाणपत्र मिळाल्याचे मला माहित नाही, साक्षीदार स्वत: सांगतात की, रामा दिवे हे सन-१९४७ – १९४८ ला मयत झालेले आहेत. सन १९४७-१९४८ मध्ये माझा जन्म झालेला नव्हता, साक्षीदार स्वत: सांगतात की, रामा दिवे यांच्या मृत्यूची माहिती मला माझ्या वडिलांनी दिलेली आहे. रामा यांनी माधव यांना दत्तक घेतले होते व रामा मयत झाल्यानंतर मला माझ्या वडिलांनी माहिती दिली.

प्रश्न- रामा दिवे सन-१९४७-१९४८ ला मयत झाले याबाबत काही शासकीय नोंद आहे काय ?

उत्तर- मी तशी नोंद मिळविण्याचे खुप प्रयत्न केले परंतू मला मिळालेली नाही.

२३. मी तशी नोंद मिळण्यासाठी न्यायालया अर्ज केला होता. त्यासाठी मी वकिलांची नेमणूक केलेली नव्हती. दावा माझे वडिल माधव यांनी सात लोकांच्या विरूध्द चालू होता. त्या सात लोकांपैकी नागोराव चिंचोल्या, भिमराव पाटिल व भानूदास पाटिल अशा तिघांची नावे मला माझ्या वडिलांनी सांगितली होती. त्या दाव्याचे कागदपत्र मी दाखल करू शकत नाही. तसा दावा माझ्या वडिलांनी दिला नाही हे म्हणणे खरे नाही. सन-१९६० ला रामा दिवे यांचा खुन झाला होता हे म्हणणे खरे नाही. सन-१९४७-१९४८ ला रामा दिवे मयत झाले हे मी खोटे सांगत आहे हे म्हणणे खरे नाही. रामा दिवे यांचे वडिल सजन दिवे हे आहेत हे म्हणणे खरे आहे. सजन दिवे यांचे वडिल रावजी दिवे हे म्हणणे खरे आहे. सजनाचा मुलगा रामा दिवे आहे हे म्हणणे खरे आहे. सजन यांचा भाऊ वैजू असल्याचे मला आठवत नाही. वैजू दिवे थोरले बंधू होते हे म्हणणे खरे आहे. वैजू दिवे हे थोरले व कुटूंब कर्ता असल्यामुळे त्यांच्या नावे जमीन सर्वे क्र.४२/१ मध्ये ११ एकर ३१ गुंठे क्षेत्र होते हे म्हणणे खरे आहे. वैजू दिवे हे थोरले व कुटूंब कर्ता असल्यामुळे त्यांच्या नावे जमीन जुना सर्वे क्र.४४/ब मध्ये ५ एकर २३ गुंठे जमीन होती हे म्हणणे खरे नाही. सन-१९५४-१९५५ चा पाहणी पत्रक उतारा मी पाहिलेला आहे.

प्रश्न- सन-१९५४-१९५५ च्या पाहणीपत्रक उता-यात वैजू दिवे याच्या नावे सर्वे क्र.४२/१ मध्ये ११ एकर ३१ गुंठे व सर्वे क्र.४४/ब मध्ये ५ एकर २३ गुंठे क्षेत्र असल्याच्या नोंदी आहेत ?

उत्तर- सर्वे क्र.४४/ब मध्ये आठ आणे भिमराव व आठ आणे माधव यांचे क्षेत्र आहे. काढलेले कागदपत्र मी दाखल केलेले आहेत.

**वादी यांच्या विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरून उलट तपास तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by PANDE RAVI VIJAYPRASAD Date: 2025.08.18 17:39:19 +0530

(रवि वि.पांडे)

दिनांक १८/०८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व.स्तर
निलंगा,जि.लातूर